**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.नितीन मारुती जगताप
रोहित निवास, मु.पो.हिंगणगाव,
ता.इंदापूर, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
तहसील कार्यालय इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२९/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.७.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.८.२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.९.२००९ |
| ५ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.नितीन मारुती जगताप यांनी माहिती प्राप्त न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दरम्यानच्या काळात अपेक्षित माहिती प्राप्त झाल्याने आपले अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि.२२.०१.२०१० रोजीच्या पत्रान्वये आयोगास अवगत केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**पुणे**
**दिनांक : ३० / ०१/२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे - ४११ ००१

श्री. चंद्रकांत रतन रोकडे **अपीलकर्ता**
सुतार कॉलनी, गोविंदनगर,
एमआयडीसी, कोडोली, सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** व्यवस्थापक, **उत्तरवादी**
जनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था (मर्या.),
२२, चाफेकर कॉम्प्लेक्स, मारुती रोड, सांगली
**जन माहिती अधिकारी तथा** व्यवस्थापक
जनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था (मर्या.),
२२, चाफेकर कॉम्प्लेक्स, मारुती रोड, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१९५८/२००९ / सातारा** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | **दि. १०/६/२००९** |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | **दि. १/७/२००९** |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | **दि. ५/९/२००९** |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** दिनांक १५/१०/२००७ ते १०/६/२००९ या कालावधीत पतसंस्थेने ज्या ठेवीदारांना ठेवी परत केल्या त्यांची नावे, खाते क्रमांक, मुदत पूर्ती दिनांक व रक्कम रुपये तपशील. | |

## विवेचन

नागरी सहकारी पतसंस्था व बँका यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र.५६६६/२००७ मध्ये दिलेला असल्याने अपीलकर्ता श्री. चंद्रकांत रतन रोकडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील दखलपात्र नाही.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे - ४११ ००१

श्री. चंद्रकांत रतन रोकडे — **अपीलकर्ता**
सुतार कॉलनी, गोविंदनगर,
एमआयडीसी, कोडोली, सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** व्यवस्थापक, — **उत्तरवादी**
जनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था (मर्या.),
२२, चाफेकर कॉम्प्लेक्स, मारुती रोड, सांगली
**जन माहिती अधिकारी तथा** व्यवस्थापक
जनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था (मर्या.),
२२, चाफेकर कॉम्प्लेक्स, मारुती रोड, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१९५८/२००९ / सातारा** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | **दि. १०/६/२००९** |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | **दि. १/७/२००९** |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | **दि. ५/९/२००९** |
| २ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u> :-** दिनांक १५/१०/२००७ ते १०/६/२००९ या कालावधीत पतसंस्थेने ज्या ठेवीदारांना ठेवी परत केल्या त्यांची नावे, खाते क्रमांक, मुदत पूर्ती दिनांक व रक्कम रुपये तपशील. | |

## विवेचन

नागरी सहकारी पतसंस्था व बँका यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र.५६६६/२००७ मध्ये दिलेला असल्याने अपीलकर्ता श्री. चंद्रकांत रतन रोकडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील दखलपात्र नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २७-०१-२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवनासमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश रामराव देशमुख ..... **अपीलकर्ता**
तर्फे ॲड.बा साहेब मधुकर पाटील
१५३६, शकुंतला बंगला, स्विमिंग टँकच्या पश्चिमेस, सांगली बेकरीजवळ, ७ वी गल्ली, गणेशनगर, सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, चौगुले मारुती शोरुमच्या माडीवरती वखारभाग, सांगली ..... **उत्तरवादी**

**जन माहित्ती अधिकारी तथा** सहायक निबंधक, सहकारी संस्था , विटा, खानापूर रोड, विटा, ता.खानापूर जिल्हा सांगली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९९२/२००९ व | १९९३/२००९ सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | २३.९.२००९ | २३.९.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे उत्तर दिल्याची तारीख | - | २८.०९.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | २९.१०.२००९ | २९.१०.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | १२.१२.२००९ | ११.११.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती-मागणीच्या मूळ अर्जांच्या (जोडपत्र-अ) छायाप्रती सोबत जोडलेल्या आहेत. | | |

## विवेचन

नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५६६६/२००७ मध्ये दिलेला आहे.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील दोन्ही अपीले (अपील क्र. १९९२/२००९ व १९९३/२००९ सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

२. नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे, ती अपीलकर्त्यानी मागितल्यास त्या त्या कार्यालयांनी अर्जदारास देणे आवश्यक आहे. त्यानुसार संबंधित कार्यालयाने कार्यवाही करावी.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ : पुणे**
**दि. ३०-०१-२०१०.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे - ४११ ००१

श्री. गुलाब फुला चव्हाण — **अपीलकर्ता**
मु.पो.जिंती, (ननवरे वस्ती), ता.फलटण,
जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार बारामती, — **उत्तरवादी**
ता.बारामती, जि.पुणे
**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार बारामती,
ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१९९८/२००९ / सातारा** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | **दि. १८/५/२००९** |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | **दि. १२/६/२००९** |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | **दि. २५/८/२००९** |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | **दि. १८/९/२००९** |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मौजे कोन्हाळी, ता.बारामती येथील महार वतनी जमिनीवरील अतिक्रमण काढणे संदर्भात | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. गुलाब फुला चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५-०१-२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. अशोक बबनराव नागवडे
एसच-५/१५, एस.टी.कॉलनी,
पुणे-सातारा रस्ता, पंचमी हॉटेलजवळ, पुणे-९ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा** अध्यक्ष,
एस.टी.को.ऑ.क्रेडिट सोसायटी लि.पुणे,
स्वारगेट एस.टी.आगार परिसर, पुणे-९ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यवाहक,
एस.टी.को.ऑ.क्रेडिट सोसायटी लि.पुणे,
स्वारगेट एस.टी.आगार परिसर, पुणे-९

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००४/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०५.१०.२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०७.१२.२००७ |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार नागरी सहकारी पतसंस्था व नागरी सहकारी बँका यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ लागू होत नाही. सबब सदरचे अपील दखलपात्र ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : २५/०१/२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.इन्नुस हसन आतार
पोलीस मुख्यालय, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक,
पोलीस मुख्यालय, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस अधीक्षक,
पोलीस मुख्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.इन्नुस हसन आतार
पोलीस मुख्यालय, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, पोलीस मुख्यालय, सातारा
श्री.सोपान महादेव जमदाडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.५.३००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.६.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

दोषारोपपत्र सादर झालेले असतानाही, तपास चालू असल्याच्या कारणावरून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती नाकारली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.इन्नुस हसन आतार यांनी केली.

श्री.आतार हे निलंबित सहाय्यक पोलीस निरीक्षक असून एका गुन्ह्यातील आरोपी आहेत. त्यांच्यावरील दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. संबंधित दाव्याचा निकाल लागलेला नाही, तोपर्यंत तपास चालूच राहतो, म्हणून माहिती नाकारण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, पोलीस मुख्यालय, जि.सातारा श्री.सो.म.जमदाडे यांनी तोंडी व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, पोलीस मुख्यालय, जि.सातारा श्री.प्र. प्र.मुत्याळ यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये लेखी नमूद केले.

गुन्ह्याचा तपास पूर्ण होऊन दोषारोपपत्रासोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास दहा दिवसात द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, पोलीस मुख्यालय, जि.सातारा यांनी आयोगाला दि.२५.२.२०१० पर्यंत सादर करावा.

**पुणे**
**दि.१५.२.२०१०**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्रीमती शकिनाबी अजमुद्दीन मुलाणी
प्राथमिक आश्रमशाळा, केम,
ता. करमाळा, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
मुख्याध्यापक,
प्राथमिक आश्रमशाळा, केम,
ता करमाळा जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.१.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.२.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.२.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.७.३.२००७ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्त्या श्रीमती शकिनाबी अजमुद्दीन मुलाणी यांनी विशेष समाजकल्याण अधिकारी सोलापूर यांनी त्यांना परिसरात येण्यास मनाई केलेल्या आदेशाच्या प्रतीची मागणी केली आहे. सदर आदेशाची प्रत प्राप्त न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा, केम यांनी दि. १५.१२.२००७ रोजी पाठविलेल्या अहवालावरून अपिलकर्त्या श्रीमती मुलाणी यांनी मागणी केलेला आदेश मौखीक असल्याने देता

येत नाही, असे अपिलकर्त्यास कळविले असून हा जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १३.१.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक वामन शिंदे
पंचशिल नगर, घोरपडी गाव, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
तहसील कार्यालय दौंड,जि.पुणे **उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय दौंड,जि.पुणे
**२) जन माहिती अधिकारी तथा** मुख्यालय सहायक,
तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख दौंड, ता.दौंड,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०४०/२००९/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.१२.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.०९.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.०७.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.४.१२.२००९ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अशोक वामन शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१२.२००९ रोजी केलेल्या अपिलासोबतच्या कागदपत्रांची छाननी केली असता, जोडपत्र 'अ' मूळ माहिती-मागणी अर्ज दि.७.१२.२००९ चा असून त्यासोबत सादर केलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक २१.०९.२००९ आहे. पत्रामधील जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड हे आहेत,

सदर उत्तर हे दि.२४.०८.२००९ च्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने सादर केल्याचे दिसते. आयोगास सदर जोडपत्र 'अ' मधील जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, तालुका भूमी निरीक्षक, भूमी अभिलेख, दौंड हे आहेत. अशा प्रकारे जोडपत्र -अ व जन माहिती अधिकारी भिन्नभिन्न संदर्भातील आहेत. तसेच द्वितीय अपील माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ नुसार विहित नमुन्यामध्ये आयोगाकडे केलेले नाही. यास्तव, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी स्पष्ट होत नसल्याने आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. : २५.०१.२०१०

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१)अॅड.सचिन स.पळसे
(२)अॅड.अजय विजय पाटील
शॉप क्र.१३, वनराज कॉर्नर सोसायटी, बी.टी.कवडे रोड,
घोरपडी गाव, पुणे -१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ,
नवीन प्रशासकीय इमारत, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासक, डॉ.बंदोरवाला शासकीय
कुष्ठरोग रूग्णालय, कोंढवा, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०९९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)अॅड.सचिन स.पळसे
(२)अॅड.अजय विजय पाटील
शॉप क्र.१३, वनराज कॉर्नर सोसायटी, बी.टी.कवडे रोड, घोरपडी गाव, पुणे -१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ,
नवीन प्रशासकीय इमारत, पुणे डॉ.व्ही.एस.कोकणे

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा प्रशासक, डॉ.बंदोरवाला शासकीय कुष्ठरोग रूग्णालय, कोंढवा, पुणे-१ डॉ.डी.जी.कबाडे | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

डॉ.बंदोरवाला लेप्रसी हॉस्पिटलमधील कर्मचारी / कामगार यांच्या संदर्भातील व मुंबई उच्च न्यायालयाने मार्च २००६ मध्ये दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रशासक, डॉ.बंदोरवाला शासकीय कुष्ठरोग रूग्णालय, कोंढवा, पुणे यांनी दिली नाही. सन १९५८ मध्ये सुरू झालेले हे रूग्णालय महाराष्ट्र शासनाने २००७ नंतर परत घेतले. २२ वर्षांपासून कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याचा सन २००२ मधील शासनाचा निर्णय असूनही त्याबाबतची माहिती दिली नाही. ७२ पदांची यादी दिली, परंतु त्या संदर्भातील माहिती दिली नाही. कुष्ठ रोगातून बऱ्या झालेल्या एकाही व्यक्तीला रूग्णालयात नेमलेले नाही. अनेक कर्मचाऱ्यांना बेकायदेशीरपणे कामावरून कमी करण्यासाठी प्रशासन अयोग्य मार्गांचा अवलंब करीत आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता ॲड.सचिन पळसे यांनी केले.

ॲड.पळसे, ॲड.पाटील यांनी सन २००१ ते २००८ अशा सात वर्षांमधील विस्तृत माहिती मागितली आहे. रूग्णालयातील कामकाजाचे स्वरूप लक्षात घेता त्यांनी प्रत्यक्ष अभिलेखाचे अवलोकन करून आवश्यक कागदपत्रांच्या प्रती मागितल्यास त्यांना त्वरित देण्यात येतील, असे त्यांचा अर्ज प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत कळविले. त्यावर त्यांनी प्रतिसाद न देता अपिलीय

प्राधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे यांच्याकडे अपील केले. एक महिन्याच्या आत माहिती निःशुल्क देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे यानी दिला. त्यानंतर १७ दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाने सर्व माहिती ॲड.पळसे यांना पाठविण्यात आली. आणखी काही माहिती हवी असल्यास कागदपत्रांचे अवलोकन करून नमूद केल्यास लगेच देता येईल, असे त्यापूर्वीच पुन्हा एकदा ॲड.पळसे यांना कळविले होते. तथापि अशी कोणतीही माहिती घेण्यास ते आले नाहीत. आपल्या कार्यालयात एका वर्षाच्या करार तत्त्वावर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांचा दावा ॲड.पळसे न्यायालयात चालवत असून त्यापोटी दबावाचा प्रयत्न म्हणून ते माहिती मागत आहेत. सन २००१ साली झालेल्या करारानुसार संबंधित कर्मचाऱ्यांबाबत कार्यवाही केलेली आहे. अशा कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घ्यावयाचे किंवा नाही हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून तो प्रलंबित आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासक, डॉ.बंदोरवाला शासकीय कुष्ठरोग रूग्णालय, कोंढवा, पुणे डॉ.डी.जी.कबाडे यांनी केले. माहिती विस्तृत असूनही संकलित करून अपीलकर्त्यांना निःशुल्क देण्यात आली आहे. तसेच आणखी माहितीही आवश्यक असल्यास कागदपत्रांचे अवलोकन करून त्यांनी मागणी केल्यास देता येईल. परंतु विस्तृत माहितीच्या संकलनासाठी साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे डॉ.व्ही.ए.कोकणे यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदन लक्षात घेता माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासक, डॉ.बंदोरवाला शासकीय कुष्ठरोग रूग्णालय, कोंढवा, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे यांनी योग्य कार्यवाही केली आहे. दिलेल्या माहितीच्या प्रती चार दिवसांत आयोगाला सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले होते. त्यानुसार १९ नस्तीमधील संकलित माहितीच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा प्रशासक, डॉ.बंदोरवाला शासकीय कुष्ठरोग

रूग्णालय, कोंढवा, पुणे डॉ.डी.जी.कबाडे यांनी आयोगाला सादर केल्या. अपीलकर्त्यांनी उपस्थित केलेले प्रशासकीय कार्यवाहीबाबतचे मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचे नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.३०.९.२०१०

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकिय इमारत, चौथा मजला,
कौन्सील हॉल समोर, पुणे ४११००१

श्री. सुरेश शंकर साळुंके,
जी/१८, देवीलिंक हौसिंग सोसायटी,
लिंकरोड, चिंचवड, पुणे - ३३.

अपीलकर्ता

विरूध्द

अपिलीय प्राधिकारी तथा (प्र.) उपसंचालक,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२/०५/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७/०७/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ०४/०७/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५/०८/२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती-** श्री. अण्णा बाबूराव सावळकर यांचे संदर्भात समितीने दिलेल्या निर्णयाची प्रत व उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिलेल्या स्थगन आदेशाची प्रत इ. | |

## विवेचन

अपीलकर्ता, श्री. सुरेश शंकर साळुंके यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ११.०१.२०२०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश हिंदुराव देसाई
२०२३, सी-वॉर्ड, सोमवार पेठ, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका.कोल्हापूर
**जन माहिती अधिकारी तथा** आरोग्य अधिकारी,
कोल्हापूर महानगरपालिका. कोल्हापूर

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **२१८ + २१९/ कोल्हापूर** |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०१-२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४-०७-२००७ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५-०६-२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३-०८-२००७ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** श्री. कुणालकुमार, आयुक्त यांनी कोल्हापूर महानगरपालिका आयुक्त पदाचा पदभार स्वीकारल्यापासून केलेल्या प्रवासाबाबतची माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दिनांक १३-०५-२००८ रोजी आयोजित केलेल्या "विशेष अपील निर्गत कार्यक्रमात" या अपीलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दिनांक ०६-०१-२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे निवेदन दिनांक ०६-०१-२००९ रोजी अपीलकर्ता श्री रमेश हिंदुराव देसाई यांनी सुनावणी वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

वरील दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५-०१-२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

डॉ. मिलींद जगन्नाथ मोरे **अपीलकर्ता**
मु.पो. पायरी प्लाझा, गोडोली, ता.व जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप विभागीय अधिकारी, **उत्तरवादी**
सातारा उपविभाग, सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** महसूल अव्वल कारकून क्रमांक१,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **५५/२०१०/ सातारा** |
| २ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | **दि. ११/१२/२००९** |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मे. आरती डेव्हलपर्स, सातारा यांनी मंजूर आराखडया व्यतिरिक्त केलेल्या अनाधिकृत बांधकामापैकी ८०.३७ चौ.मी. रहिवास व १४०.८९ चौ.मी. वाणिज्य या क्षेत्रास दिलेल्या परवानगी संबंधीच्याचतु:सीमा क्षेत्रफळाच्या साक्षांकित प्रती. | |

## विवेचन

अपीलकर्ता डॉ. मिलींद जगन्नाथ मोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २७-०१-२०१०

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. शेख अल्ताफ महमद
हाजी इब्राहिम इस्टेट, स्टेशन रोड, अहमदनगर ... अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माण (दहिवडी) ता. माण, जि. सातारा ... [illegible]

जन माहिती अधिकारी तथा निवासी तहसीलदार, माण (दहिवडी)
ता. माण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२० + २२१ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००९ |

३ उपस्थित

अपीलकर्ता — श्री. शेख अल्ताफ महमद
हाजी इब्राहिम इस्टेट, स्टेशन रोड, अहमदनगर

अपिलीय प्राधिकारी तथा — तहसीलदार, माण (दहिवडी) ता. माण, जि. सातारा
श्री. आर. आर. सोनटक्के

जन माहिती अधिकारी तथा — निवासी तहसीलदार, माण (दहिवडी)
ता. माण, जि. सातारा श्री. जोगेंद्र कट्यारे

| | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | [illegible] |
|---|---|---|---|---|
| अपील क्र. २२० | २६.२.२००७ | २१.३.२००७ | १५.४.२००७ | [illegible] |
| अपील क्र. २२१ | २६.२.२००७ | ३०.४.२००७ | १४.५.२००७ | [illegible] |

४ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

विवेचन

आपल्या वडिलोपार्जित शेतजमिनीच्या संदर्भात चुकीचा व बेकायदेशीर फेरफार करून [illegible] अधिकारी व कर्मचारी यांनी [illegible] उताऱ्यावर खोट्या नोंदी केल्या आहेत. [illegible]

आपण न्यायालयात व प्रशासकीय पातळीवर झगडत असून याबाबतची माहिती अभिलेखांच्या वर्गीकरणाचा आधार घेऊन आपल्याला नाकारली जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. शेख अलताफ महंमद यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात व लेखी निवेदनात केली आहे.

श्री. शेख अलताफ महंमद यांना विहित मुदतीत माहिती देण्यात आली आहे. सन [illegible] ते १९४८ दरम्यानच्या ( कागदपत्रांची ) जबाबांची माहिती ते मागत असून हे कागदपत्र व वर्गीकरणात्मक असल्यामुळे नाश करण्यात आले आहेत. तसेच त्यांच्या सर्व कागदपत्रांमधील मागणी माहितीची नसून चुकीच्या नोंदी झाल्याच्या तक्रारीबाबत प्रशासकीय कार्यवाहीची आहे. याबाबत ते सातत्याने वेळोवेळी अर्ज करीत असून वेळोवेळी त्यांना उत्तरे देण्यात आली आहेत. याबाबत त्यांनी मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन कायदा, १९४८ किंवा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९४८ अन्वये अपील / पुर्नविलोकन अर्ज दाखल करुन दाद मागणे आवश्यक आहे, असे अपीलकर्त्यास यापूर्वी वेळोवेळी लेखी व तोंडी स्पष्ट करण्यात आले आहे, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, माण (दहिवडी), ता. माण श्री. जोगेंद्र कट्यारे यांनी केले. अपीलकर्त्यास सर्व संबंधित अभिलेखाचे अवलोकन करू देण्याची तयारीही त्यांनी नमूद केली.

अभिलेखांच्या वर्गीकरणानुसार नष्ट केलेले कागदपत्र वगळता इतर सर्व अभिलेखाचे अवलोकन करुन आवश्यक त्या प्रती अपीलकर्त्यास प्राप्त करून घेता येतील. फेरफाराबाबत बेकायदेशीरपणा व चुकीच्या नोंदी याबाबतची अपीलकर्त्याची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. १९.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुधीर माधव जोशी
फ्लॅट नं.१५, बिल्डिंग नं.२,
५८७, दत्तप्रसाद सोसायटी,
पुणे सिंहगड रोड, पुणे -३० **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी**
शिवदर्शन मित्रमंडळ ट्रस्ट,
१२, शिवदर्शन कॉलनी, पर्वती, पुणे-९ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
शिवदर्शन मित्रमंडळ ट्रस्ट,
१२, शिवदर्शन कॉलनी, पर्वती, पुणे-९

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२६/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.०९.२००६ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३०.१०.२००६ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - दि.३१.०३.१९८७ ते २०.०८.२००६ या कालावधीतील संस्थेच्या विश्वस्तांची नावे, पत्ते, संस्थेच्या मालकीची स्थावर व जंगम मालमत्ता, [illegible], वार्षिक अहवाल व तद्नुषांगिक ७ मुद्दे | |

**विवेचन**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक [illegible] मध्ये सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती सार्वजनिक प्राधिकरण ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. असा निर्णय दिला आहे. विषयांकित संस्था सार्वजनिक प्राधिकरण

ठरते, याचे कोणतेही पुरावे अपीलकर्ता श्री. सुधीर माधव जोशी यांनी दिलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील हे दाखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. : २२.०१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर पोपट दडस
नेवसेवस्ती, पो.पाडेगाव, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कं., विभाग फलटण, फलटण, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं., विभाग फलटण, फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२६ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कं., विभाग फलटण, फलटण, जि.सातारा श्री.दिपक कुमठेकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कं., विभाग फलटण, फलटण, जि.सातारा श्री.विजय नाळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.८.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.शंकर पोपट दडस यांना माहितीसाठी शुल्क भरण्यास कळविले, परंतु शुल्क भरल्याची पावती जन माहिती अधिकाऱ्यांना त्यांनी सादर केली नाही. तशी पावती सादर केल्यानंतर माहिती देण्याचे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या चर्चेत 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी ठरले होते. त्यानुसार श्री.दडस यांनी पावती सादर केल्यानंतर त्यांना दि.२४.१०.२००८ रोजी समक्ष माहिती देण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं., विभाग फलटण, फलटण, जि.सातारा श्री.विजय शंकरराव नाळे व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं., विभाग फलटण, फलटण, जि.सातारा श्री.दिपक अनंत कुमठेकर यांनी पूरक कागदपत्रांसह व दिलेल्या माहितीच्या प्रतींसह केले. मात्र आपल्याला मिळालेली माहिती अपुरी असल्याची तक्रार श्री.दडस यांनी दि.२.११.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. तथापि सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता मूळ अर्जानुसार देय माहिती देण्यात आलेली आहे, असे स्पष्ट होते..

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**पुणे**
**दि.१८.१.२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**